# भूगोल

## उत्तरे : सराव प्रश्नपत्रिका 4 थी

**प्र. 1.**

(1) भारतातील <u>चेन्नई</u> या शहरात नोव्हेंबर महिन्यात पाऊस पडतो.

(2) ब्राझील <u>सांबा</u> या नृत्यप्रकारासाठी प्रसिद्ध आहे.

(3) भारतातील <u>पश्चिम बंगाल</u> राज्यात ताग उद्योगाचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे.

(4) लिंग गुणोत्तर म्हणजे एखाद्या प्रदेशातील <u>दरहजारी</u> पुरुषांच्या तुलनेत असलेली स्त्रियांची संख्या.

**प्र. 2.**

(1) सुरीनाम (2) हिमालयीन वने

(3) सौदी अरेबिया (4) म्यानमार.

**प्र. 3.**

(1) भारतातील पूर्व किनारपट्टीवर त्रिभुज प्रदेश आढळतात.


(2) जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे १७.५ टक्के लोकसंख्या भारतात आहे.

(3) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात दाट व केंद्रित स्वरूपाच्या वस्त्या आढळतात.

(4) भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त अलाहाबाद शहराजवळून जाते.

(5) एखाद्या ठिकाणास प्रत्यक्ष भेट देऊन तेथील भौगोलिक व सांस्कृतिक घटकांची माहिती मिळवणे, म्हणजे 'क्षेत्रभेट' होय.

**प्र. 4. (अ)**



**प्र. 4. (आ)**

(1) वाहतूक सेवांचे प्रमुख लोहमार्ग व विमानतळ हे प्रकार नकाशामध्ये दिसत आहे.

(2) भारताच्या उत्तरेकडील भागात म्हणजेच उत्तर प्रदेश व बिहार येथे रेल्वेमार्गांची घनता जास्त आहे.

(3) गुजरातमधील दोन रेल्वेस्थानके : (i) अहमदाबाद (ii) राजकोट.

(4) महाराष्ट्राच्या पूर्व भागातील दोन रेल्वेस्थानके : (i) नागपूर (ii) चंद्रपूर.

(5) भारताच्या दक्षिणेकडील दोन विमानतळे : (i) बंगळुरू (ii) चेन्नई.

**प्र. 5.**

**(1)** (१) ॲमेझॉन नदीच्या प्रदेशात लोकवस्तीचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

(२) या भागात उद्योगांचे प्रमाणही तुलनेने कमी आहे. परिणामी, ॲमेझॉन नदीच्या प्रदेशात तुलनेने कमी प्रमाणात जलप्रदूषण होते.

(३) गंगा नदीच्या प्रदेशात लोकवस्तीचे प्रमाण तुलनेने अधिक आहे. या भागात उद्योगांचे प्रमाणही तुलनेने अधिक आहे. परिणामी, गंगा नदीच्या प्रदेशात तुलनेने अधिक प्रमाणात जलप्रदूषण होते. त्यामुळे ॲमेझॉन नदीच्या तुलनेत गंगा नदीच्या जलप्रदूषणाचा परिणाम लोकजीवनावर जास्त होतो.

**(2)** (१) कॉफीच्या उत्पादनात ब्राझीलचा जगात प्रथम क्रमांक लागतो.

(२) जगातील कॉफीच्या एकूण उत्पादनापैकी सुमारे ४० टक्के कॉफीचे उत्पादन ब्राझील देशात होते.

(३) ब्राझील देशातून कॉफीची सर्वाधिक प्रमाणावर निर्यात केली जाते. म्हणून, ब्राझील देशास 'जगाचा कॉफी पॉट' असे संबोधले जाते.

**(3)** (१) ब्राझीलमधील उत्तरेकडील भागात खाणकाम व्यवसाय विकसित झालेला नाही.

(२) ब्राझीलमधील उत्तरेकडील भाग विषुववृत्ताजवळ आहे. या भागात पर्जन्याचे व तापमानाचे प्रमाण अधिक आहे.

(३) या भागातील ॲमेझॉन नदीखोऱ्याच्या प्रदेशात घनदाट व सदाहरित वर्षावने आहेत आणि त्यामुळे हा प्रदेश दुर्गम आहे.


(४) या भागात वाहतुकीच्या सोईसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे ब्राझीलमधील उत्तरेकडील भागात खाणकाम व्यवसाय विकसित झालेला नाही.

**(4)** (१) ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील सदाहरित घनदाट वर्षावनांनी व्यापलेला दुर्गम प्रदेश आहे.

(२) ब्राझीलच्या उच्चभूमीमुळे निर्माण झालेला प्रदेशांचा उंचसखलपणा आहे.

(३) ब्राझीलमध्ये दलदलीचा प्रदेश आहे. म्हणून ब्राझीलमध्ये लोहमार्गांचा विकास झालेला नाही.

**प्र. 6. (अ)**




(1) वरील आकडेवारीतील वर्षांतर १० वर्षे आहे.

(2) १९६० ते १९७० या काळात नागरीकरण वेगाने झालेले आढळते.

(3) २००० ते २०१० या दशकात शहरी लोकसंख्या सर्वांत कमी गतीने, म्हणजे ३.१ टक्क्यांनी वाढली.

**प्र. 6. (आ)**

(1) २०१६ साली अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न सर्वाधिक होते.

(2) २०१६ साली अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न सुमारे १८५० दशलक्ष यू.एस. डॉलर होते.

(3) ब्राझील आणि भारत यांची तुलना करता, १९८० साली ब्राझीलचे राष्ट्रीय उत्पन्न अधिक होते.

(4) ब्राझील आणि भारत यांची तुलना करता, २०१६ साली भारताचे राष्ट्रीय उत्पन्न अधिक होते.

(5) २०१६ साली भारत आणि ब्राझील या देशांमधील स्थूल राष्ट्रीय उत्पन्नांतील फरक हा सुमारे १० दशलक्ष यू.एस. डॉलर इतका होता.

(6) साल २०१६ मधील विकसित राष्ट्रे व विकसनशील राष्ट्रे यांच्या स्थूल उत्पन्नांतील फरक सुमारे १६८० ते १६९० दशलक्ष यू.एस. डॉलर इतका होता.

**प्र. 7.**

**(1)** क्षेत्रभेटीदरम्यान सातत्याने पुढील गोष्टींची काळजी घेऊ : (१) क्षेत्रभेटीदरम्यान स्वतःची व इतरांची सुरक्षितता पाहू आणि ओळखपत्र, प्रथमोपचार पेटी, अत्यावश्यक दूरध्वनी क्रमांकांची यादी बरोबर ठेवू.

(२) क्षेत्रभेटीदरम्यान शिक्षकांच्या सूचनांचे पालन करू.

(३) क्षेत्रभेटीदरम्यान स्थानिक लोकांशी संपर्क साधून तेथील परिस्थितीची सखोल व अचूक माहिती मिळवू.

(४) क्षेत्रभेटीदरम्यान क्षेत्रातील मालमत्तेचे व तेथील पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याविषयी खबरदारी घेऊ.

**(2)** (१) ब्राझीलच्या किनारपट्टीच्या भागात तांदूळ, काकाओ या पिकांचे उत्पादन होते.

(२) तांदूळ, काकाओ इत्यादी पिकांना उष्ण व दमट हवामान व भरपूर पर्जन्य लागते. म्हणजेच, ब्राझीलच्या किनारपट्टीच्या भागात उष्ण व दमट हवामान असते आणि तेथील पर्जन्याचे प्रमाणही तुलनेने अधिक असते.

(३) ब्राझील उच्चभूमी भागात कॉफी, सोयाबीन, संत्री इत्यादी पिकांचे उत्पादन होते.

(४) कॉफी, सोयाबीन, संत्री इत्यादी पिकांना मध्यम पर्जन्य व थंड हवामान लागते. म्हणजेच, ब्राझील उच्चभूमीच्या भागात हवामान थंड असते. तेथील पर्जन्याचे प्रमाण मध्यम स्वरूपाचे असते.

**(3)** (१) भारतातील ज्या प्रदेशांत दीर्घकाळ कोरडा उन्हाळा व ५०० मिमीपेक्षा कमी पर्जन्य होतो, अशा प्रदेशांत काटेरी व झुडपी वने आढळतात.

(२) भारतातील गुजरात व राजस्थान राज्यांत व राजस्थानमधील थरच्या वाळवंटी प्रदेशात काटेरी व झुडपी वने आढळतात.

(३) भारतातील काटेरी व झुडपी वनांमध्ये खैर, बाभूळ, खेजडी इत्यादी वनस्पती व कोरफड, घायपात इत्यादी निवडुंगाचे प्रकार आढळतात.

(४) बाष्पीभवनामुळे पाण्याचे प्रमाण कमी होऊ नये यासाठी या वनांतील वनस्पतींची पाने आकाराने लहान असतात.

---